# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १६९-२३** **दिनांक :- २७/०५/२०२३**

## घरफोडी चोरी करणा-या आरोपीतास अटक- पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २०/०५/२०२३ रोजी २३.३० वा. ते दिनांक २१/०५/२०२३ रोजी ०६.०० वा. दरम्यान बिल्डींग नं. १५, रिलायबल बिल्डींग, रिलायन्स पेट्रोल पंपाचे मागे, पेल्हार, नालासोपारा (पु.), ता.वसई, जि.पालघर येथे फिर्यादी व साक्षीदार यांचे राहते घराचे दरवाजे व खिडक्या कशाचे तरी सहाय्याने उचकटुन त्यावाटे आत प्रवेश करुन, त्यांचे घरातील एकुण५४,०००/- रुपये किंमतीचे मोबाईल फोन असा मुद्देमाल फिर्यादी व साक्षीदार यांचे संमतीशिवाय कोणीतरी अज्ञात चोरटयाने घरफोडी चोरी करुन नेले बाबत फिर्यादी नामे. श्री. विनोद तिरत यादव यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीताविरुध्द पेल्हार पोलीस ठाणेत गुन्हा रजि.नं. I ४९१/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५७, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वर नमुद दाखल गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज व गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपी नामे. अब्दुल रेहमान ताहिर वडू, रा. पेल्हार गाव, नालासोपारा (पु.) यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली आहे. त्याचेकडून गुन्हयात चोरीस गेलेले एकुण ५४,०००/- रुपये किंमतीचे मोबाईल फोन असा १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. वसंत लब्दे, पो.नि. श्री. महेंद्र शेलार (गुन्हे) व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, प्रताप पाचुंदे, पो.अंम. संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, यांनी केली आहे.

----ooo----